आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

१५ जानेवारी २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज नौदलाच्या सुरत, नीलगिरी या नौकांचं आणि वाघशीर या पाणबुडीचं राष्ट्रार्पण

- ७७व्या लष्कर दिनानिमित्त देशाचं सेनादलाला अभिवादन

- केंद्रीय औद्योगिक संरक्षण दलाच्या दोन राखीव बटालियनच्या निर्मितीला केंद्र सरकारची मंजुरी

**आणि**

- आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठाला सुवर्णपदक

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतात नौदलाची सुरुवात केली, त्या शिवरायांच्या भूमीवरून नौदलाच्या दोन नौका आणि एक पाणबुडीचं राष्ट्रार्पण करताना समाधान वाटत असल्याची भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज  आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी या नौकांचं आणि आयएनएस वाघशीर या पाणबुडीचं राष्ट्रार्पण झालं, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या १० वर्षात वाढवण बंदराला मंजुरी, सीमावर्ती भागांमध्ये वाढता संपर्क, भारतमाला योजना, व्हायब्रंट व्हिलेज कार्यक्रम, इत्यादी कार्यक्रमांमुळे भारत सागरी शक्ती म्हणून उदयाला येत असल्याचं मोदी म्हणाले.

हिंद-प्रशांत महासागर क्षेत्रात भारतीय नौदलाची मजबूत उपस्थिती आवश्यक असल्याचं मत यावेळी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केलं. या युद्धनौकांची पंचाहत्तर टक्के बांधणी स्वदेशात झाल्याबद्दल संरक्षणमंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं. मुंबईच्या नौदल गोदीमधे झालेल्या या कार्यक्रमाला, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह नौदलातले अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

सशस्त्र दलाच्या अतुलनीय बलिदानाचा सन्मान करण्यासाठी आज लष्कर दिन साजरा केला जात आहे. याच दिवशी १९४९मध्ये तत्कालीन जनरल के. एम. करिअप्पा यांनी शेवटच्या ब्रिटीश कमांडर इन चीफकडून भारतीय सैन्याची सूत्रं हातात घेतली होती. या घटनेच्या स्मरणार्थ लष्कर दिन साजरा केला जातो.

लष्कर दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लष्करातले जवान आणि ज्येष्ठ तसंच निवृत्त सैन्य अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सैनिक देशाच्या प्रगतीसाठी आणि समृद्धीसाठी शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी योगदान देतात, असं मुर्मू यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लष्कर दिनानिमित्त सैनिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. दृढनिश्चयाच्या बळावर भारतीय लष्कराने सदैव देशाचं संरक्षण केलं आहे. तसंच नैसर्गिक संकटांच्या काळातही तत्परतेनं मदत केली आहे. असं मोदी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत. सरकार सैन्य दलांमध्ये विविध सुधारणा तसंच आधुनिकीकरणाला प्राधान्य देत असल्याचंही मोदी म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही समाज माध्यमावरच्या संदेशातून सैन्यातल्या जवानांना शुभेच्छा दिल्या आहेत. सैनिकांना दाखवलेल्या शौर्याच्या

बळावरच भारतीय लष्कर हे जगातल्या सर्वोत्तम लष्करांपैकी एक ठरलं आहे. प्रतिकूल परिस्थितीतही ते देशाचं रक्षण करण्यासाठी सज्ज असतात आणि प्रसंगी सर्वोच्च बलिदान देतात, असं म्हणत शहा यांनी देशासाठी शहीद झालेल्या सैनिकांना अभिवादन केलं आहे.

**<><><><>**

७७ व्या लष्कर दिनाचं मुख्य संचलन आज पुण्यात बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर झालं. लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मानवंदना स्वीकारली. लष्कर, पोलीस दल आणि महाराष्ट्र छात्रसेनेच्या महिला पथकाचा संचलनात सहभाग होता. प्रथमच नेपाळचा लष्करी वाद्यवृंदही या कार्यक्रमात सहभागी झाला होता. लष्कर दिनानिमित्त संध्याकाळी होणाऱ्या गौरव गाथा या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींच्या बदल्या केल्या आहेत. तेलंगण उच्चन्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आता मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असतील. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांना दिल्ली उच्च न्यायालयाचं मुख्य न्यायाधीश पद मिळालं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदानं गेल्या ७ जानेवारीला त्यांच्या बदलीची शिफारस केली होती.

**<><><><>**

येत्या रविवारी १९ तारखेला आकाशवाणीवर 'मन की बात' कार्यक्रमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११८वा भाग असेल. त्यासाठी आपल्या सूचना आणि कल्पना पाठवण्याचं आवाहन

करण्यात आलं आहे. 1800-11-7800 या टोल फ्री क्रमांकाबरोबर मायजीओव्ही आणि नमो ॲपवरुनही संपर्क साधता येईल.

**<><><><><>**

सीआयएसएफ अर्थात केंद्रीय औद्योगिक संरक्षण दलाच्या दोन राखीव बटालियनच्या निर्मितीला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे सीआयएसएफच्या बटालियनची संख्या १५ होणार आहे. या बटालियनमध्ये १ हजार २५ सैनिक असतील तसंच याचं नेतृत्व वरिष्ठ कमांडंट स्तराचा अधिकारी करेल. नव्या बटालियनमध्ये अति सुरक्षित कारागृहाची व्यवस्था हाताळण्याचा अनुभव असणारे सैनिक असतील.

**<><><><><>**

चंदीगडच्या पंजाब विद्यापीठात ९ ते १८ जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठानं सुवर्णपदक पटकावलं आहे. ५० मीटर थ्री पोझिशन रायफल नेमबाजीत पुरुष गटात रुद्रांक्ष पाटील याने आपल्या उत्कृष्ट नेमबाजीच्या जोरावर ६०० पैकी ५९३ गुण मिळवत सुवर्णपदक मिळवलं. यापूर्वी रुद्रांक्षने आशियाई क्रीडा स्पर्धेत देशाला सुवर्णपदक मिळवून दिलं होतं. रुद्रांक्षनं गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर इथल्या ऑलिंपियन नेमबाज ऐश्वर्य प्रतापसिंग तोमर याला एका गुणानं मात देऊन सुवर्ण पदकावर आपलं नाव कोरलं. या स्पर्धेत देशभरातल्या १४५ विद्यापीठांमधील १ हजार ९०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते.

**<><><><><>**

विजेच्या उपलब्धतेनुसार पुरवठा आणि त्याचं नियंत्रण करण्यासाठी नावीन्यपूर्ण योजनांची यशस्वी अंमलबजावणी केल्याबद्दल महापारेषणच्या महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला गौरवण्यात आलं आहे. ऐरोलीच्या या केंद्राला देशातलं सर्वोत्कृष्ट भार प्रेषण केंद्र आणि ओपन ऍक्सेस या दोन राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

इंडिपेंडेन्ट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया या राष्ट्रीय संस्थेनं बेळगावमध्ये हा पुरस्कार सोहळा आयोजित केला होता. देशभरातल्या विद्युत कंपन्यांच्या कामगिरीचं मूल्यमापन करून हे पुरस्कार दिले जातात.

**<><><><><>**

संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये कटकारस्थान रचण्याच्या आरोपाखाली वाल्मीक कराड याच्यावर संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर बीड जिल्ह्यातल्या परळी शहरात तणावपूर्ण शांतता असल्याचं वृत्त आहे. परळी शहरात पोलिसांनी ठिकठिकाणी बंदोबस्त तैनात केला असून बाजारपेठ बंद आहे. वाल्मिक कराड याला आज केज इथल्या न्यायालयात हजर केलं जाणार असल्यामुळे केज न्यायालय परिसरामध्येही मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. दरम्यान, परळीत व्यापाऱ्यांनी वाल्मीक कराडच्या समर्थनार्थ आजपासून बेमुदत संप पुकारला असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

निलंबित प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकरला सर्वोच्च न्यायालयानं अटकेपासून संरक्षण दिलं आहे. दिल्ली उच्च न्यायालयानं तिचा अटकपूर्व जामीन

फेटाळला होता. त्यावर तिनं सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. त्यावर सर्वोच्च न्यायालयानं आज सुनावणी घेतली, आणि तिच्याविरुद्ध कठोर पावलं उचलू नयेत, असे आदेश दिले.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे राजकोट इथं भारत आणि आयर्लंड यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेतल्या तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात भारतानं आज निर्धारित ५० षटकात पाच बाद ४३५ धावा केल्या आहेत. सलामीवीर प्रतिका रावळनं ठोकलेलं शतक आणि कर्णधार स्मृती मानधनाच्या झंझावाती शतकाच्या जोरावर भारतानं धावांचा डोंगर उभा केला आहे. रावळनं १२९ चेंडूत १५४ अशी सुरेख खेळी केली तर मानधनानं केवळ ८० चेंडूत १३५ धावा केल्या. तत्पूर्वी भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. भारतानं पहिले दोन सामने जिंकून या आधीच २- ० अशी आघाडी घेतली आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या भारत खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीत भारताची अनुपमा उपाध्याय दुसऱ्या फेरीत पोहोचली आहे. तिनं पहिल्या फेरीत रक्षिता रामराजचा २१-१७, २१-१८ असा सरळ गेममधे पराभव केला. आज दुपारी मालविका बनसोडचा सामना चीनच्या हान यु हिच्याशी होईल. पुरुष एकेरीत आज लक्ष्य सेन, एच एस प्रणॉय आणि प्रियांशु राजावत यांचेही सामने होतील.

**//<><><><><>//**